## मा. राज्यमंत्री यांचा संदेश-

मागील वर्षी १ जुलै, २०१६ रोजी एकाच दिवशी दोन कोटी वृक्ष लागवडीचा संकल्प वन विभागाने लोकसहभागातून सहजपणे सिध्दीस नेला. लोकसहभागाची प्रेरणा घेऊन पुढील तीन वर्षात पन्नास कोटी वृक्ष लागवडीचा संकल्प वन विभागाने केला आहे. पन्नास कोटी वृक्ष लागवडीच्या माध्यमातून पर्यावरण रक्षणाची एक लोकचळवळ उभी राहील, हे निश्चित, वन, वन्यजीव, निसर्ग, पर्यावरण रक्षणासाठी काहीतरी ठोस कृती करण्याची तीव्र इच्छा हा या लोकचळवळीचा पाया असणार आहे.

पर्यावरणविषयक अनेक प्रश्नांनी सद्या गंभीर स्वरूप धारण केले आहे. वनांचा ऱ्हास हे त्याचे एक मुख्य कारण आहे. वनांचा ऱ्हास थोपविणे व वृक्षाच्छादन वाढविणे यासाठी वन विभाग प्रयत्नशील आहे.

पर्यावरण संतुलनासाठी एकूण भूभागाच्या ३३%भू भाग वृक्षाच्छादित असणे गरजेचे आहे. याचाच अर्थ राज्यातील उपलब्ध २०% वनक्षेत्राचे संरक्षण व संवर्धन करणे आवश्यक असून वनेतर क्षेत्रावर जास्तीत जास्त वृक्ष लागवडीला प्रोत्साहन देणे जरुरीचे आहे.

हे कार्य सिध्दीस नेण्यासाठी मोठ्या लोकसहभागाची आवश्यकता आहे. लोकसहभाग वाढविण्यासाठी वनविभाग विविध मार्गांनी प्रबोधनाचे काम करीत आहे. वन विभाग व जन समान्य यांची नाळ जोडण्याचा प्रयत्न करीत आहे. वन विभागाकडून राबविणेत येणारे " हॅलो फॉरेस्ट १९२६ ", " हरितसेना महाराष्ट्र " यासारखे उपक्रम याच उद्देशाने राबविणेत येत आहेत.

विविध जनजागृतीपर कार्यक्रमांच्या माध्यमातून वन विभाग लोकांपर्यंत पोहोचत आहे. याची फलनिष्पती मागील वर्षी १ जुलै, २०१६ रोजी दिसून आली. या एका दिवशी वन विभागाने इतर विभाग व जनसामान्यांच्या मदतीने दोन कोटी वृक्ष लागवडीचा संकल्प सहज साध्य केला. पुढील तीन वर्षात निश्चित केलेल पन्नास कोटी वृक्ष लागवडीचे लक्ष्य तुम्हा सर्वांच्या मदतीने निश्चित साध्य करू अशी मला खात्री वाटते.